**Indian Streams Research Journal**
**Vol -1 , ISSUE –1, Feb - 2011**
**ISSN:-** 2230-7850 Available online at www.isrj.org

# "मध्ययुगीन काळातील वस्तुंचे बाजारभाव व शासनाचे भाव–नियंत्रण"

**नारायण दत्तात्रय बनसोडे**

सहाय्यक प्राध्यापक , इतिहास विभाग ,संतोष भीमराव पाटील कॉलेज ,
मंद्रुप, ता.दक्षिण सोलापूर, सोलापूर.

**प्रस्तावना –**

इ.स. 1206 मध्ये कुतुबुद्दीन ऐबक याने दिल्ली येथे स्वतंत्र सुलतानशाहीची स्थापना केली. दिल्लीच्या गादीवर गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद व लोदी या वंशानी राज्य कारभार केला. साधारणतः महसुल कर, जकात कर हे यांच्या राज्याचे उत्पन्नाची महत्त्वाची साधने होती. मध्ययुगीन सुलतानाची सत्ता, मुघल सत्ता या या लष्करी सत्ता होत्या. साम्राज्य विस्तारासाठी, संरक्षणासाठी व परकिय रानटी टोळ्यांच्या आक्रमणापासुन राज्याचे संरक्षण करण्यासाठी लष्कराची गरज होती, त्यामूळे प्रचंड मोठ्या प्रमाणावर लष्कर उभारले गेले. या सैन्यांला रोख स्वरुपात वेतन देणेही गरजेचे बनले हाते. इ.स.1526 मध्ये तुर्की बाबराने लोदी वंशाचा शेवटचा सुलतान इब्राहिम खान लोदी याचा पराभव करुन दिल्लीवर मुघल सत्तेची स्थापना केली. मुघलांनी सुलतानापेक्षा मोठा साम्राज्य विस्तार केला. सम्राट अकबराच्या साम्राज्यात 15 सुभे होते. याच्यात वाढ होवुन औरंगजेबाच्या साम्राज्यात 37 सुभे असल्याची माहिती मिळते. मध्ययुगातील महंमद तुघलक, अल्लाऊद्दीन खिलजी, सम्राट अकबर, सुलतान शेरशहा या शासकांनी जनतेच्या कल्याणासाठी सुधारणा घडवुन आणल्या. शेती, उद्योग, व्यापार यामध्ये सुधारणा घडवुन आणल्या. तसेच आपल्या राज्यातील जनता सुखी–समाधानाने राहिली पाहिजे याकडे लक्ष दिले. सुलतान अल्लाऊद्दीन खिलजी याने त्याच्या काळात जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीवर नियंत्रण बसवण्याचा प्रयत्न केला. बाजारभाव नियंत्रण ही संकल्पना राबविली, व जनतेला स्वस्त दराने धान्य व इतर जीवनावश्यक वस्तु मिळाल्या पाहिजेत याकडे लक्ष दिले होते. मुघल काळात सुलतान शेरशहाने बाजारावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक केली होती. सम्राट अकबर ही स्वतः वेशांतर करुन बाजारभावाची व वस्तुची भेसळ होते का हे पाहण्यासाठी बाजारात फिरल्याची माहिती मिळते. दक्षिणेतील विजयनगरचे साम्राज्य व मराठ्यांचे राज्य येथेही बाजारभावांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केलेला होता. मध्ययुगीन काळात सततची युध्दे, दुष्काळ, महापुर, रोगराई अशा संकटामूळे वस्तुंच्या किंमतीत वाढ झाल्याची दिसते. अशावेळी शासनाकडून या वाढलेल्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाय योजनाही केलेल्या दिसतात.

***संषोधनाची उद्दिष्टे :***

(1)मध्ययुगातील समाजाच्या आर्थिक जीवनाचा अभ्यास करणे.
(2)मध्ययुगातील शासनाच्या आर्थिक बाबी व उत्पादन स्त्रोताचा अभ्यास करणे.
(3)मध्ययुगातील वस्तुंच्या किमतीची माहिती घेणे.
(4)शासनाच्या वतीने वस्तुंच्या किंमतीवर ठेवलेल्या नियंत्रणाची माहिती घेणे.
(5)मध्ययुगीन उद्योग व व्यापाराची माहिती घेणे.
(6)बाजारात कोणत्या वस्तु विकल्या जात होत्या त्या वस्तुंची माहिती घेणे.
(7)शासनाच्या आर्थिक धोरणाची माहिती घेणे.

**मध्ययुगीन आर्थिक जीवन :–**

मध्ययुगात शेती हे बहुतांश लोकांच्या उपजीवीकेचे महत्त्वाचे साधन होते. शेतीतुन मिळणाऱ्या उत्पन्नातुनच लोकांचा उदरनिर्वाह चालत होतो. साधारणतः सत्ताधारी वर्ग शहरात राहत होता. व्यापारी, कारागीर व सामान्य लोक हे शहरात व ग्रामात दोन्ही ठिकाणी राहत होते. व्यापारी वर्ग वेगवेगळ्या शहरात फिरुन व्यापार करित हाता. कसब्याचा ठिकाणी यांची दुकाने असत. कारागीर स्वतःचा व्यवसाय करित होता तर शेतकरी शेती करुन आपला उदरनिर्वाह करित होता. सामान्य लोक

मजुरी करुन उपजीवीका करित होता. मध्ययुगात सत्ताधारी व व्यापारी वर्ग सोडला तर शेतकरी, कारागीर व सामान्य वर्ग यांची स्थिती वाईट होती. युरोपीय प्रवासी टेरी लिहतो, "शेतकऱ्यांची स्थिती वाईट हाती. त्यामुळे त्यांना गहु खाणे अशक्य होते. बंगाली कवी मुकुंद राम लिहतो की, "खेड्यातील गरीब लोक फक्त सण उत्सव प्रसंगीच दूध, तुप, मिठाई खात असे, तसेच मीठ खाणे परवडत नव्हते. 16 व्या शतकात मिठाच्या किंमती गव्हापेक्षा दुप्पट हात्या. यावरुन शेतकरी, कारागीर, सामान्य वर्ग यांची स्थिती वाईट हाती असे दिसुन येते. अबुल फजल, युरोपीय प्रवासी राफ फिंच लिहतात की, "शेतकऱ्यांना पुरेसे कपडे मिळत नव्हते. खेड्यातील स्त्रिया चोळीचा वापर करत नव्हत्या. मोरलँड लिहतो की, "शेतकरी व सामान्य वर्ग पायात पाद्त्राणे घालित नव्हते. असे असले तरी अन्नधान्याच्या किमती स्वस्त होत्या. त्यामुळे लोक उपाशी राहत नव्हते. जीवनावश्यक वस्तु स्वस्त होत्या असे मोरलँड म्हणतो. सुलतान काळात शहरातील लोकांना अन्न–धान्य स्वस्त मिळत होते. फिरोज तुघलकाच्या काळात एक कुटुंब त्यामध्ये पती, पत्नी, दोन मुले व एक नौकर असलेला परिवार 5 टंका इतक्या पैशात एक महिना उदरनिर्वाह करित होता.

**सरकारचे आर्थिक धोरण –**

मध्ययुगीन काळात शेती हा जनतेचा प्रमुख व्यवसाय होता. 17 व्या शतकाच्या प्रारंभी भारताची लोकसंख्या 12.5 करोड होती, असे अनुमान काढले जातात आणि या लोकांना शेती करण्यासाठी भरपुर जमीन उपलब्ध हाती असे दिसते. ज्या शेतकऱ्याकडे मनुष्यबळ जास्त आहे, तो जास्तीची जमीन कसत होता. शिवाय राज्यात मोठ्या प्रमाणवर पडिक व गायरान जमिनी होत्या सरकारकडुन त्या जमिनी शेतकऱ्यांना कसण्यासाठी देवुन त्यांना महसुल करात सवलत देवुन जमीन लागवडी खाली आणण्याचे प्रयत्न केले जात होते. शेतीच्या विकासासाठी मुघल शासकांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले होते. शेतकऱ्यांना आर्थिक मदत व शेतीची अवजारे पुरवुन शेती उत्पादन वाढवण्यास उत्तेजन दिले जात होते. शेतीतुन मिळणारे महसुल कर हे राज्याच्या उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन होते. शेती सुधारणेकडे लक्ष दिले होते. साधारणतः तलाव, विहिरी, नाले यामार्फत पाणीपुरवठा केला जात होता. फिरोजशहा तुघलक याने कालवा खोदल्याची माहिती मिळते. महंमद तुघलक याने आदर्श कृषी योजना तयार केली होती. जास्ती–जास्त जमिन लागवडीखाली आणणे यामागचा उद्देश होता. शेरशहा सुरीने शेतीत सुधारणा केली. सम्राट अकबराने ही राजा तोरडमल याच्याकडे कृषी खाते सोपविले याने महसुल करात सुधारणा केल्या मध्ययुगीन काळात महसूल कर शेतकऱ्याला जड जाणार नाही. याची दक्षता सत्ताधीशांनी घेतली होती. साधारणतः 33% $\left(\frac{1}{3}\right)$ इतका महसुल कर आकारला जात होता. दूष्काळ, महापुर, रोगराई, युध्दजन्य परिस्थितीमूळे पिकांचे नुकसान झाल्यास अशावेळी शेतकऱ्यांना सवलत दिली जात होती.

मध्ययुगीन शासकाचे जकात कर हे उत्पन्नाचे साधन होते. या काळात अंतर्गत व परकिय असा दोन्ही प्रकारचा व्यापार केला जात होता. मध्ययुगात व्यापारी क्षेत्रात भरभराट झालेली होती. अनेक नवीन शहरांचा विकास व्यापारामूळे झालेला होता. व्यापारासाठी रस्त्यांची निर्मिती करण्यात आली होती. या रस्त्याच्या दुतर्फात झाडे लावली होती. तसेच सराया, विहिरी बांधण्यात आल्या होत्या. व्यापाऱ्यांना त्याच्या मालाला संरक्षण दिले होते. विशेष म्हणजे व्यापारी वस्तुंना विम्याची सुरक्षा दिली होती. व्यापाऱ्याच्या वाढीसाठी योग्य ती काळजी घेण्यात आली होती. ग्रामीण भागात लहान मोठ्या उद्योग व व्यवसायात भरभराट झाली होती. ग्रामीण भागात लहान मोठ्या उद्योग व व्यवसायात भरभराट झाली होती. ग्रामीण भागात तयार होणाऱ्या 20% वस्तू बाजारात विकण्यास येत असत. अन्न धान्याचे उत्पादन आठवडी बाजार, कसब्याचे ठिकाण येथे विकले जात होते. उच्च कुलीन वर्गासाठी लागणाऱ्या चैनीच्या वस्तु तयार करुन त्या विकल्या जात होत्या. यामधुनच शहरांचा विकास झालेला दिसुन येतो. व्यापारी वस्तुंवर शासनाकडुन जकात कर घेतला जात होता. साधारणतः $2\frac{1}{2}\%$ पासुन ते 24% इतका जकात कर घेतला जात होता. त्या मोबदल्यात व्यापारी व त्याच्या वस्तुंना संरक्षण दिले जात होते. मध्ययुगात व्यापारी केंद्राच्या ठिकाणी व आठवडे बाजार येथे वस्तुच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जात होता, कारण जनता सुखी व समाधानी राहिल याकडे लक्ष देण्यात आले होते. मध्ययुगातील राज्ये हे लष्करी राज्ये होती, राज्याच्या संरक्षणासाठी व वाढीसाठी मोठ्या प्रकरणावर लष्कर उभे केले जात होते. या लष्कराला रोख स्वरुपात पगार दिला जात होते. मिळणाऱ्या पगारामध्ये त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत होता. त्याचा उदरनिर्वाह चालणे आवश्यक असल्याने सत्ताधीशांनी वस्तुंच्या किंमतीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. युरोपीय प्रवाशांनी जे लेखन केले आहे, त्यामध्ये कनिष्ठ दर्जाच्या नौकराला महिना 2 रुपये वेतन दिले जात होते. सैनिकांना फक्त 3 रुपये वेतन दिले जात होत. या वेतनामध्ये त्याचा उदरनिर्वाह चालत असे. सामान्यतः अन्नधान्याच्या किंमती कमी होत्या. परंतू कपडे, चपला, मीठ, साखर यांच्या किंमती जास्त होत्या असे मोरलँड म्हणतो.

**भाववाढीचे कारणे :**

मध्ययुगीन काळात वस्तुंच्या किंमती, त्या वस्तुंचे बाजार भाव वाढण्याची कारणे पुढीलप्रमाणे होती, वस्तुंच्या किंमती नेहमीप्रमाणे मालाची मागणी व पुरवठा यांच्यातील संबंधावर ठरत असत. तथापि सततची युध्दे, अशांतता, चलनात असणाऱ्या

पैशाचे कमी—जास्त प्रमाण, आवश्यक वस्तुंचा पुरवठा, यात बदल होत गेल्यास वस्तुंच्या किंमतीतही बदल होत असे, वाहतुकीच्या व दळणवळणाच्या साधनांची स्थिती, व्यापार करणाऱ्या विविध जमातीतील संबंध, व्यापाऱ्यांना होणारा पुरवठा, नैसगिक बदल, परकिय आक्रमण, व्यापारी व कारागीर यांना होणाऱ्या पतपुरवठ्याची सुलभता, देशातील उद्योगधंद्यातुन तयार होणाऱ्या मालाचे उत्पादन, याशिवाय सरकारचे व्यापार विषयक धोरणही वस्तुंच्या नियमित भावात बदल घडवुन आणत असत. या विविध कारणांमूळे वस्तुचे भाव वाढत असल्याचे दिसते.

**मध्ययुगातील सुलतान काळात वस्तुंचे बाजार भाव :**

सुलतान महंमद तुघलक याच्या साम्राज्यात 24 सुभे असल्याची माहिती मिळते. दक्षिणेतील मलबार पर्यंत तुघलकाचे साम्राज्य पसरले होते. परंतु या काळातील जनतेच्या आर्थिक स्थितीची माहिती कमी प्रमाणात मिळते. या काळातील इतिहासकारांनी सामान्य जनतेच्या जीवनापेक्षा दरबारातील घटनांचे लिखाण करण्यात आवड दाखवलेली दिसते. परंतु तरीही वस्तुंच्या किंमती विषयी त्यांनी काही प्रमाणात माहिती दिली आहे. चौदाव्या शतकात इब्न बतुता भारतात आला, मुहम्मद तुघलक याच्या दरबारात राहिला. त्याने या काळातील पिकांची व शेतकऱ्यांची माहिती दिली आहे. अनेक उद्योग व व्यवसायाची माहिती लिहून ठेवली आहे.

सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याने राज्याचे रक्षण करण्यासाठी आणि आपल्या वटहुकुमांची अंमलबजावणी करण्यासाठी सुसज्ज सैन्याची निर्मिती केली. त्याने राजधानी दिल्लीत 4 लाख 50 हजार सैन्य तयार केले. या सैन्यांना रोख वेतन अदा केले जात होते. जहागिरीच्या स्वरुपात वेतन देणे त्याने बंद केले. पहिल्या श्रेणीतील सैन्याला वार्षिक 234 टंका (म्हणजे 1 रु बरोबरीचा) पगार दिला जात होता. दुसऱ्या श्रेणीतील सैनिकाला 156 टंका तर तिसऱ्या श्रेणीतील सैनिकाला 78 टंका वेतन दिले जात होते. अल्लाउद्दीनने प्रचंड लष्कर निर्माण केले परंतु एवढ्या मोठ्या सैन्याचे पोषण कसे करावे हा प्रश्न त्यांच्या समोर होता. तेव्हा अल्लाउद्दीनने एका मार्गाने राज्यातील कराचे प्रमाण वाढवून उत्पन्नात भर घातली, आणि दुसऱ्या मार्गाने जीवनावश्यक वस्तुंचे भाव नियंत्रीत करुन त्या अल्प किंमतीत सर्वसाधारण लोकांना सहज वस्तु मिळतील याची व्यवस्था केली आणि बाजारात येणाऱ्या आवश्यक वस्तुंचे भाव निश्चित करुन दिले ते पुढीलप्रमाणे

| वस्तुंचे नांव | किंमत | वजन |
|---|---|---|
| गहु | $7\frac{1}{2}$ जीतल | 1 मणास |
| तांदूळ | $5\frac{1}{2}$ जीतल | 1 मणास |
| डाळ | $5\frac{1}{2}$ जीतल | 1 मणास |
| उडिद | $5\frac{1}{2}$ जीतल | 1 मणास |
| तुप | $1\frac{1}{2}$ जीतल | 2 शेर |
| साखर | $1\frac{1}{2}$ जीतल | 1 मणास |
| मीठ | 5 जीतल | 1 मणास |
| हरभरा | 5 जीतल | 1 मणास |
| गुळ | $1\frac{1}{3}$ जीतल | 1 शेर |
| बारीक मलमल | 1 टंका | 40 गज |
| तहु | 10 ते 25 टक्क्याला | 1 तहू |
| दुभती गाय | 3 ते 4 टंका | 1 गाय |
| शेळी, मेंढी | 10 ते 14 जीतल | 1 जोडी |

अल्लाउद्दीनने मीठाया, भाज्या, कंगवे, मोजे, सुया, यासारख्या वस्तुंचेही भाव निश्चित केले होते. या शिवाय

| वस्तु | निश्चित केलेली किंमत |
|---|---|
| उत्तम प्रकारचा घोडा | 100—200 टंका |
| दुय्यम प्रकारचा घोडा | 80—90 टंका |
| तृतीय प्रतीचा घोडा | 65—70 टंका |
| सुंदर गुलाम मुलगी | 20—30 टंका |
| अनुभव नसलेला गुलाम पुत्र | 7 ते 8 टंका |
| कामकारी गुलाम मुलगी | 5 ते 12 टंका |

| | |
|---|---|
| घरकाम करणारा गडी | 7 ते 8 टंका |
| गुलाम | 100 ते 200 टंका |

(काही इतिहासकाराच्या मतानुसार 1 जितल म्हणजे 1 पैसा तर 1 टंका म्हणजे 1 रुपया बरोबरीचा होता.) (वरील तक्ते व संदर्भ, श.गो.कोलारकर–मध्यकालीन भारत आणि कृ.ना. चिटणीस – मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग–3)

याशिवाय कापडाच्या किंमतीही निश्चित करण्यात आल्या होत्या. बर्नीच्या वर्णनावरुन, दिल्ली येथे 'कझ' या रेशमी कापडाची किंमत 16 टंका होती. शिरिन बफत याची किंमत 5 टंका होती. सिलाहटीची किंमत 6 टंका होती, नागोरच्या लाल किनारीची किंमत 24 जीतल होती. चादरीची किंमत 10 जीतल इतकी होती. या वस्तुंच्या किंमती निश्चित केल्यानंतर याची अंमलबजावणी करण्यासाठी कडक कायदे केले. धान्य बाजारात प्रत्येक शेतकऱ्याने आपले धान्य नेमलेल्या व्यापाऱ्यास निश्चित केलेल्या दरात विकावे, सरकारतर्फे व्यापाऱ्यांना अन्नधान्याचा निश्चित कोटा देण्यात आला होता. शहना–ए–मंडी या अधिकाऱ्याची या धान्य बाजारावर देखरेख करण्यासाठी नेमणूक केली होती.

अल्लाउद्दीन नंतर महंमद तुघलकाच्या काळात किंमती पुन्हा वाढल्या, पण त्यानंतर इब्राहिम लोदीच्या काळापर्यंत त्या हळुहळु उतरत गेल्या. प्रत्येक सुलतानाच्या काळात वस्तुंचे भाव वेगवेगळे असल्याचे दिसतात. जलालुद्दीन खिलजीच्या काळात दुष्काळ असताना धान्याची किंमत 1 जित्तलला 1 शेर अशी होती. गव्हाचा भाव 1 शेर 18 जीतल किंवा $5\frac{1}{3}$ शेर 1 जीतल इतका होता. तर महंमद तुघलकाच्या काळात 1 शेराला 17 जीतल इतका भाव होता. इब्राहिम लोदीच्या काळात 1 ते 6 जीतलमध्ये 10 मण धान्य मिळत असे. एक कुटुंब 5 टंका पगारात एक महिना व्यवस्थित राहत असे. या काळात साखरेची किंमत जास्त असल्याचे दिसते. एका मणाला 60 जीतल किंमत होती. फिरोज तुघलकाच्या काळात वाढुन एका मणाला 120 जीतल इतकी झाल्याचे दिसते.

**मध्ययुगीन मुघल काळातील वस्तुंचे बाजारभाव –**

मुघल काळात शांतता असल्यामूळे व्यापारात वाढ झालेली होती. सुलतान शेरशहा व अकबर यांनी शेतीत सुधारणा केल्या होत्या. या काळात शेतकरी व सामान्य लोकांचा वर्ग सुखी–समाधानी होता असे दिसुन येते. या काळात जीवनावश्यक वस्तु स्वस्त होत्या. एडवर्ड टेरी लिहतो की,"मुघलशाहीत विपुलता होती. जीवनावश्यक वस्तुंची टंचाई नव्हती. साधारणतः दूध, तुप, लोणी, धान्य, पालेभाज्या, कपडे, मटण, फळे, मासे ही दररोज लागणारी वस्तु स्वस्त होती, असे दिसते, याशिवाय या काळातील इतर वस्तुंचे भाव पुढीलप्रमाणे

| वस्तुंचे नांव | वजन | किंमत |
|---|---|---|
| गहु | 12 मण | 1 रु |
| उत्तम तांदूळ | 10 मण | 1 रु |
| बार्ली | 08 मण | 1 रु |
| मुग | 18 मण | 1 रु |
| मीठ | 16 मण | 1 रु |
| मेंदी | 01 मण | $1\frac{1}{2}$रु |
| दूध | 44 शेर | 1 रु |
| मटण | 16 शेर | 1 रु |

हे वरील बाजार भाव असले तरी, सामान्य माणसाच्या राहणीमान याविषयी इतिहासकारात मतभेद आहेत. व्हीन्सेट स्मिथच्या मते, "त्या काळातील भूमिहिन मजूर आजच्यापेक्षा चांगले जीवन जगत होता", तर मोरलँडच्या मते, 'जनतेची आर्थिक स्थिती आजच्या सारखी होती. सम्राट अकबराच्या काळात लोकांचे उत्पन्न मर्यादित असले तरी त्यांच्यावर उपासमारीची वेळ येत नव्हती. जीवनावश्यक वस्तु स्वस्त होत्या असे दिसुन येते. शहाजहाँच्या काळात शेतकरी अतिशय सुखी आणि समाधानी होता असे मुरलँड म्हणतो.

**विजयनगर राज्यातील वस्तुंचे बाजारभाव :**

विजयनगर या दक्षिणेतील राज्यातही वस्तुंचे बाजारभाव वेगवेगळे होते असे दिसते. पेईस या परकिय प्रवाशाने विजयनगर राज्यातील वस्तुंच्या किंमतीची माहिती दिली आहे. त्याच्या मते अन्नधान्य व इतर वस्तुंच्या किंमती कमी होत्या. या काळात तीन कोंबड्या एक विंटेम इतक्या किंमतीला मिळत होत्या. (एक विंटेम म्हणजे 10 नवे पैसे) शहराबाहेर (विजयनगर)

याच किंमतीला चार कोंबडे मिळत होते. एक विंटेमध्ये दोन ससे, इतक्याच किंमतीला 6 ते 8 तितर मिळत होते. एका डुकराची किंमत चार ते पाच फॅनममध्ये दहा डाळिंबे तर इतक्याच किंमतीला तीन घड द्राक्षे मिळत असल्याचे उल्लेख मिळतात. न्युनिझा या प्रवाशाच्या वर्णनानुसार 12 कोंबड्या एक वराह किंमतीला मिळत होत्या. (एक वराह म्हणजे दहा रुपये अशाप्रकारे विजयनगर राज्यात वस्तुंच्या किंमती आढळतात ग्रामीण भागात या वस्तु आणखीन स्वस्त होत्या असे दिसुन येते.)

**मराठा राज्यात वस्तुंचे बाजार भाव –**

मराठा काळात विशेषतः पेशवे काळात वस्तुंचे भाव पुढीलप्रमाणे होते. प्रत्येक वर्षी वस्तुंच्या भावात वाढ झालेली दिसते. 1720 मध्ये तांदूळ 1 रुपयात 18 शेर येत असे. 1756 मध्ये 1 रुपयात 8 शेर येत असे. 1777 मध्ये 20 रुपयांना 48 शेर तांदूळ मिळत होते. 1765 मध्ये 16 शेर गहु एक रुपयात मिळत होते. तुप एक रुपयात 1 शेर, मिळत होते. 1720 मध्ये 1 रुपयात 22 ते 40 शेर बाजरी मिळत होती. परंतु 1744 मध्ये इतक्याच किंमतीत 60 शेर इतकी बाजरी मिळत होती. म्हणजे किंमती कमी झाल्याचे दिसते. 1720 मध्ये 1 शेर गुळ 2 आणे तर 1 शेर साखर 4 आण्याला मिळत होती. मीठ एक आण्याला 1 शेर मिळत असे. 1750 एक बैल 10 रुपयात मिळत होता. 1771 मध्ये 16 रुपये, 1778 मधे 20 रु तर 1786 मध्ये 15रु. होती. पेशवा थोरले माधवराव यांच्या काळात वस्तुंच्या किंमती पुढीलप्रमाणे होत्या.

| वस्तुंचे | वजन /शेर (मापी) | किंमत |
|---|---|---|
| गहु | 16 शेर | 1 रु |
| ज्वारी | 16 शेर | 1 रु |
| हरभरा डाळ | 8 शेर | 1 रु |
| मुग | 12 शेर | 1 रु |
| तांदूळ | 12 शेर | 1 रु |
| तीळ | 3 शेर | 1 रु |
| गुळ | 5 शेर (वजनी) | 1 रु |
| सैंधव | 2 शेर (वजनी) | 1 रु |
| सुंठ | 1 शेर (वजनी) | 1 रु |
| खोबरे | 2 शेर (वजनी) | 1 रु |
| जिरे | 2 शेर (वजनी) | 1 रु |
| कणिक | 12 शेर (वजनी) | 1 रु |
| कापुस | 4 शेर (वजनी) | 1 रु |
| दूध | 11 शेर (वजनी) | 1 रु |
| मुगाच्या शेंगा | 8 शेर (वजनी) | 1 रु |
| ऊद | अदपाव | 1 रु |
| बदाम | 1 अदपाव | 1 रु |
| सुफरी | 3 अदपाव | 1 रु |
| तंबे | एक वजनी शेरास | 2 रु |
| हिंग | एक वजनी शेरास | 5 रु |
| नवसागर | एक वजनी शेरास | 2 रु |
| लाकडे एक खंडी | एक वजनी शेरास | 7 रु |

अशाप्रकारे मराठा कालखंडातही वस्तुंच्या किंमतीची माहिती उपलब्ध होते.

***वस्तुंच्या किंमतीवर शासनाचे नियंत्रण :–***

एकंदरीत मध्ययुगात प्रत्येक राज्यामध्ये वस्तुंच्या वेगवेगळ्या किंमती काळाप्रमाणे बदलत गेल्या होत्या असे दिसते. या काळात जनता सुखी राहील याकडे शासनाने लक्ष दिल्याचे दिसते. यासाठी उपाययोजनाही केल्या होत्या. असे म्हणता येईल. कारण सुलतान अल्लाउद्दीनने दिल्ली येथ 'सराय–ए–आदल' या कापड बाजारपेठेची तर 'शहना–ए–मंडी' या धान्य बाजारपेठेची स्थाना केली होती. या बाजारातील वस्तूंच्या किंमतीवर त्याने नियंत्रण ठेवण्याचे ठरविले त्याने उचलले प्रथम वस्तुंच्या किंमती ठरविल्या. घाऊक व्यापारी व फिरते व्यापारी यांना किंमतीचे बंधन पाळण्याचे आदेश दिले होते. याचे पालन न

करणाऱ्यास कडक शिक्षा दिली जात होती. भाव नियंत्रणाची योजना अंमलात आणण्यासाठी चारित्र्य संपन्न अधिकाऱ्याची नेमणुक केली होती. काळाबाजार साठेबाजी, भ्रष्टाचार नष्ट करण्याकरिता कडक कायदे केले. भाव नियंत्रण कायद्याने पालन हाते का नाही हे पाहण्यासाठी अल्लाउद्दीनने गुप्तहेर ठेवले होते अशी माहिती मिळते. खोटी वजन बाळगणाऱ्या व्यापाऱ्याला तुरुंगात टाकले जात होते. वस्तुंचे वजन कमी झाल्यास व्यापाऱ्यांना फटक्यांची शिक्षा दिली जाई, तसेच वस्तु कमी तोलणाऱ्या व्यापाऱ्यांना शरीरातुन तेवढेच मांस काढले जात होते. व्यापाऱ्या बरोबरच शेतकऱ्यावरही काही बंधने घालण्यात आली होती. शेतकरी स्वतः जवळ उदरनिर्वाहा एवढेच धान्य ठेवुन बाकीचे सर्व धान्य सरकारने ठरवून दिलेल्या भावाने फिरत्या विक्रेत्यांना विकत असत शिवाय हे सर्व विकत घेतलेले धान्य व्यापारी दिल्लीमध्ये आणतात का नाही हे पाहण्यासाठी अधिकाऱ्यांची नेमणुक केलेली होती. सरकारच्या या कडक उपाय योजनामूळे बाजार भावावर नियंत्रण बसले होते. मुघल काळात अकबराने खान–ए–सामान या अधिकाऱ्याची नियुक्ति केली होती. याचे व्यापारावर नियंत्रण होते. साम्राज्यात उत्पादित होणाऱ्या वस्तुंचा परदेशात प्रचार करुन व्यापार वाढीसाठी हा अधिकारी प्रयत्न करित असे. स्वतः अकबर आग्रा येथील बाजार पेठेव वेश बदलून जाऊन वस्तुंच्या किंमती, भेसळ माल याची माहिती घेत होता, अशी माहिती मिळते. शहाजहाँनच्या काळात शेतकरी सुखी होता. दैनंदिन गरजेच्या वस्तु स्वस्त मिळत होत्या असे इतिहासकारांचे म्हणणे आहे. मराठा राज्यात वस्तु कोणी विकाव्या यासंबंधी जसे नियम असत, तसेच तो त्यांनी कोणत्या भावाने विकाव्या याचेही नियम असत. नियम मोडणाऱ्यांना कडक शासन केले जाई. एकुणच सरकारने या काळात भाव नियंत्रित ठेवून समाज हीत जापाण्याचा प्रयत्न केल्याचा दिसतो.

निष्कर्ष :–

यावरुन आपणास असे दिसुन येते की, या काळातील शासकांनी वस्तुंच्या किंमतीवर नियंत्रण ठेवुन समाजहित, जोपासण्याचा मोठा प्रयत्न केला. सामान्य जनता सुखी–समाधानी राहिल याकडे लक्ष दिले होते. या काळातील लोकांना पायात चपला घालायला मिळत नव्हत्या. परंतु जीवनावश्यक वस्तु स्वस्त असल्यामूळे लोक पोट भरुन खात होते असे दिसते. उपासमार होत नव्हती. उल्लाउद्दीनने खिलजीने स्वार्थापोटी बाजार भावावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला होता, असे असले. तरी त्याच्या या धोरणाचा सैन्यासह, शेतमजूर, शेतकरी, सामान्य जनता यांना फायदा झाला होता. बाजार भाव नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न या काळातील शासकांनी केल्यामूळे व्यापारी व व्यापारी वस्तूंवर सरकारचे नियंत्रण बसले. वस्तुंच्या बाजार भाव नियंत्रणामूळे मुघल साम्राज्यात ही जनता सुखी समाधानी होती.

**संदर्भ –**

1. भिडे, नलावडे, नाईकनवरे – मध्ययुगीन भारत
2. शा.गो. कोलारकर – मध्ययुगीन भारत
3. डॉ.सतीशचंद्र – मध्यकालीन भारत
4. कृ.ना.चिटणीस – मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग–3, व्यापार व उदद्योगधंदे
5. म.श्री.माटे – मध्ययुगीन महाराष्ट्र
6. मा.म.देशमुख – दिल्ली सुलतानशाहीचा इतिहास
7. शिंदे, पवार – मुघलकालीन भारताचा इतिहास
8. ढवळे, बारगळ – मध्ययुगीन भारत
9. सरदेसाई बी.एन. – मराठ्यांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास
10. W.H.Moorland-from Akbar to Aurangzeb अनुवाद राजेंद्र बनहट्टी – अकबर ते औरंगजेब
11. पवार व्हि.पी. – उत्तर पेशवाईतील वस्तुंचे बाजारभाव व भाव नियंत्रण – अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद अधिवेषन 19 वे शोध निबंध संग्रह